# नोनीची किमया

नमस्कार ! माझे नाव पीटर! तुमचे नोनीच्या चमत्कारी विश्वास मन:पूर्वक स्वागत ! नोनी ही निसर्गाने मानवाला दिलेली अमूल्य देणगी आहे. मोरिंडा सिट-ीफोलिया नामक वनस्पतीपासून मिळणारे नोनी हे फळ आहे. मोरिंडा हे नाव मोरेस इंडिकस (modes indicus) या लॅटीन शब्दापासून तयार झालेले आहे. मोरेस म्हणजे मलबेरी आणि इंडिकस म्हणजे इंडियन, भारतीय.

आपल्या शरीराला रोजच्यारोज आवश्यक असणारी १५० पोषकद्रव्ये (neutraceuticals) नोनी फळात असतात, ही १५० पोषकद्रव्ये मानवी शरीराला अगदी योग्य अशा प्रमाणात व शरीराकडून सहजपणे शोषली जातील अशाप्रकारे नोनी फळाच्या रसात उपलब्ध असतात.

नोनी हे शरीरातील विषारी द्रव्ये (टॉक्सीन्स) प्रभावीपणे नष्ट करते, आपण खत असलेल्या अन्नपदार्थातून, श्वसन करीत असलेल्या हवेतून व पित असलेल्या पाण्यातून, तसेच साबण, टूथपेस्ट आणि धुण्याच्या साबण, पावडरीद्वारे आपले शरीर दररोज, प्रतिक्षणी विषारी द्रव्ये स्वीकारीत असते. दुर्दैवाने आपले शरीर नैसग्रिकरित्या या विषारी वा रासायनिक द्रव्याचा निचरा करू शकत नाही. मग शरीरात साचत असलेल्या या विषारी द्रव्यांचा एक हलकासा पातळ आवरण, अन्य पेशींबरोबर आवश्यक तो संपर्क सावत्याने प्रस्थापित करण्यासाठी, मृदू व लवचिक असणे आवश्यक असते. जर पेशी व त्यावरील आवरण कडक बनले व त्यातील लवचिकता कमी झाली तर त्यांचा अन्य पेशींशी योग्य तो संपर्क साधला जात नाही. नोनीचा रस विषारी द्रव्यांचा थर साफ करून, पेशी व त्यावरील आवरण मोकळे व मृदू बनते आणि पेशींमधील संपर्क सुयोग्य पद्धतीने होऊन शरीर निरोगी राखण्यास मदत होते. अशी ही नोनी रसाची प्रभावी कार्यपद्धती आहे की ज्यायोगे विषारी द्रव्यांचा निचरा आकुं चन तरी पावतात वा बंद तरी होतात. त्यामुळे आपण खाल्लेल्या अन्नपदार्थातील सूक्ष्म पोषकद्रव्ये (micro nutrients) पेशींपर्यंत पोहोचू शकत नाहीत. आपण ज्यावेळी आजारी पडतो त्यावेळी डॉक्टरांकडे जातो. बऱ्याचवेळा असे घडते की डॉक्टरांनी दिलेलं औषध लागू पडत नाही. नोनीच्या रसामुळे पेशींची तोंडे मोकळी होतात व आपण खाल्लेल्या अन्नपदार्थाताल सुक्ष्मपोषकद्रव्ये पेशींचवली जातात. तसेच आपण घेतलेले औषध पेशींमध्ये पोहोचविले गेल्यामुळे शरीर रोगमुक्त होण्यास सहाय्य होते.

नोनी हे एक पेशींचे प्रभावाली खाद्यदेखील आहे. त्यामुळे शरीरातील प्रत्येक पेशी सशक्त केली जाते व त्यामुळे शरीर निरोगी बनते. जेव्हा पेशी निरोगी असतातात तेव्हा पेशी समूह (tissues) सुद्धा निरोगी बनतात, त्यामूळे आपले अवयव सशक्त बनतात व आपले संपूर्ण शरीर बनते. याउलट, जेव्हा आपल्या पेशी दुर्बल असतात तेव्हा आपले पेशीसमूह, आपले

अवयव आणि आपली शरीर यंत्रणा व्याधीग्रस्त बनते व आपण आजारी पडतो. नोनी फळाचा रस हा गुणकारी व सुरक्षित असा वेदनामुक्तीचा उपाय असल्याचे सिद्ध झाले आहे. आज बाजारात उपलब्ध असणारी बहुतेक वेदनाशामक औषधे, प्रदीर्घकाळ घेत राहिल्यास गंभीर असे साईड इफेक्ट्स निर्माण करतात. कॉक्स (Cox) नावाच्या एन्झाईम्समुळे (enzymes) शरीरात वेदना उत्पन्न होतात. एकूण दोन प्रकारची एन्झाईम्स आपल्या शरीरात निर्माण होत असतात. एक कॉक्स वन व दुसरे कॉक्स टू. कॉक्स वन हे चांगले एन्झाईम असून, त्याचा पोटाच्या अस्तराच्या व आतड्याच्या संरक्षणासाठी उपयोग असतो. कॉक्स टू हे एन्झाईम शरीरात वेदना, जळजळ व सूज निर्माण करते. तुम्ही जेव्हा एखादे वेदनाशामक औषध घेता, तेव्हा ते वरील दोन्ही प्रकारच्या एन्झाईम्सचे कार्य रोखते. म्हणजेच कॉक्स वनचे कार्य थांबविले गेल्यामुळे. तुमच्या पोटावरील व आतड्यावरील आरणाचे संरक्षण केले जात नाही. जेव्हा तुम्ही नोनी फळाच्या रसाचे सेवन करता तेव्हा तो रस अचुकपणे वेदना, जळजळ व सूज यांना कारणीभूत असणाऱ्या कॉक्स टू एन्झाईमचे कार्य तेवढे थांबविते. अशाप्रकारे नोनी रस वेदनाशामक म्हणून व कोणतेही साईड इफेक्ट्स न निर्माण करणारा असा सुरक्षित व गुणकारी उपाय आहे.

नोनी रस हा ताण-तणावांपासू मुक्ती मिळविण्यासाठीसुद्धा परिणामकारक असल्याचे सिद्ध झाले आहे. कारण, नोनी कळाचा रस शरीरात सिरॉटॉनिन (serotonin) व एन्डोर्फिन्स (endorphines) नावाची सुखदायक भावना निर्माण करणारी रसायने पुरेशा प्रमाणात निर्माण करतो. जेव्हा आपले शरीर सिरॉटॉनिन व एन्डॉर्फिनने स्वच्छ केले जाते. तेव्हा आपल्या आत सुखसंवेदना निर्माण होते. नोनी फळाच्या रसामुळे आपल्या शरीरात सिरॉटॉनिन व एन्डॉर्फिनची विशिष्ट राखली जाते. त्यामुळे ताण-तणावाची कशीही स्थिती असली तरी आपल्या शरीरात सुखकारक भावना निर्माण केली जाते, राखली जाते.

नोनी फळाचा रसामुळे शरीर यंत्रणेची रोगप्रतिकारकता राखली जाते. शास्त्रज्ञांना असे आढळून आले आहे की, १९६० साली असलेल्या माणसांच्या रोगप्रतिकार शक्तीच्या केवळ ६० टक्के रोगप्रतिकार शक्ती आज लोकांच्यात शिल्लक राहिली आहे. रोगप्रतिकार शक्तीया उपयोग विषाणू संसर्ग. जीवाणू संसर्ग व अन्य सांसर्गज्य रोगांपासून शरीराचे संरक्षण करण्यासाठी होतो. बाह्य आक्रमकांपासून संरक्षण करण्याऐवजी या रोगप्रतिकार करणाऱ्या पेशी आपल्याच शरीरातील रोगग्रस्त पेशींवर हल्ला चढवतात व स्वयं रोगप्रतिकारक (auto immune diseases) बनतात. स्वयं रोगप्रतिकारात कोणते रोग वा व्याधी समाविष्ट आहेत? तर, मधुमेह, संधीवात इत्यादी व्याधी वानगीदाखल सांगता येतील. जेव्हा तुम्ही नोनी फळाचा रस घेता, तेव्हा तो तुमची रोगप्रतिकार शक्ती नियंत्रणात ठेवतो. त्यामुळे कोणतीही व्याधी स्वयं रोगप्रतिकार करण्याच्या स्थितीस पोहोचत नाही. आपले शरीर म्हणजे एक रसायनांचा कारखानाच म्हटला पाहिजे. जेव्हा आपण ऐकतो, बोलतो वा चालतो त्यावळी हा कारखाना चालू असतो. एका पदार्थांचे रुपांतर दुसऱ्या पदार्थात करणे, याप्रकारच्या रासायनिक प्रक्रिया

आपल्या शरीरात सतत चालू असतात. नैट-ीक ऑक्साईड हा गॅसचा एक रेणू होय. तो आपल्या शरीरात निर्माण होत असतो. शरीराच्या बहुतेक सर्व कार्यात त्याची आवश्यकता असते. संशोधनात असे आढळून आले आहे की, नोनी फळाच्या रसामुळे शरीराला पुरेशा प्रमाणात नैट-ीक ऑक्साईड निर्माण करण्यास सहाय्य मिळते. जेव्हा आपल्या शरीरातील रसायनांची स्थिति उत्तम असेल तेव्हा आपले शरीरदेखील उत्तम स्थितीत असते. नोनी फळाचा रस निरोगी पेशींचे आरोग्य राखण्यास मदत करतो व आजारी पेशींना निरोगी बनवितो. अशाप्रकारे नोनी फळाचा रस हा निरोगी तसेच व्याधीग्रस्त लोकांना उपयुक्त आहे.

याशिवाय, नोनी फळाचा ॲडॉप्ट जीन (adopt gin) करीतासुद्धा उपयुक्त आहे. ॲडॉप्ट जीन म्हणजे काय ? ॲडॉप्ट जीन हा एक पदार्थ असून तो शरीर यंत्रणेला सर्वसामान्य पातळीवर कार्य करण्यास मदत करतो. दुसऱ्या शब्दात सांगावयाचे झाल्यास, ॲडॉप्ट जीनमुळे शरीरात सुसंवादित्व निर्माण होते. आपल्या शरीरात स्वतःच स्वताला बरे (self-healing) करणारी यंत्रणा वा स्वताला कामासाठी सिद्ध करणारी (self-preparing) यंत्रणा कार्यरत असते. जेव्हा आपल्याला एखादी जखम होते, तेव्हा आपले शरीर ती जखम स्वतःच बरी करू शकते. कारण, तशाप्रकारचे कार्य करणारी यंत्रणा आपले कार्य त्वरीत सुरू करते. ही यंत्रणा जेव्हा आपले कार्य सुयोग्य प्रकारे करीत असते. अशावेळी आपले शरीर औषधोपचारांना योग्य तो प्रतिसाद देऊ लागते. याउलट, जर या यंत्रणेत काही बिघाड झाल्यास, औषधोपचार त्यावेळी लागू पडत नाहीत. नोनी फळाचा रस पेशींवर आपले कार्य करून शरीराची स्वतःला स्वतःच बरे करणारी यंत्रमी मजबूत करतो. याप्रकारे नोनी फळाच्या रसामुळे औषधोपचारांचा सुयोग्य परिणाम घडू लागतो.

शरीरातील हालचाली नोनी फळाच्या रसामुळे केल्या जाऊन अन्नपचन चांगले होते, शरीराला नवचैतन्य प्राप्त होते, झोप चांगली लागते व तुम्हाला सुखदायक असा अनुभव येतो. म्हणून तुम्ही ज्या ज्या वेळी नोनी फळाचा रस प्याल त्या प्रत्येकवेळी निसर्गाला खात्रीने धन्यवाद द्याल. तुम्हाला ज्याने नोनी फळाचा रस दिला त्याचेही तुम्ही आभार मानाल.

तुम्ही माझे बोलणे शांतपणे ऐकून घेतले, याबदल मी तुमचा आभारी आहे. निरोगी राहण्याच्या तुमच्या निर्धाराबद्दलही मी तुम्हाला धन्यवाद देतो. मी तुमच्यावर मनापासून प्रेम करतो.

*ह्या वीडियो कार्यक्रमाचा उद्देश फक्त नोनी फळाची माहिती देणे हाच आहे. डॉक्टरांनी सांगीतलेल्या माहितीची बरोबरी करणे नाही। या कार्यक्रमात सांगीतलेली कोणतीही गोष्ट कुठल्याही रोगाचे निदान नाही.*